**महावितरण** (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
**सीआयएन : यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५**
दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
संकेतस्थळ : www.mahadiscom.in
वाणिज्य विभाग, प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई - मेल : cecomm@mahadiscom.in

**पी.आर-३/सबसिडी/** No 02202 **दिनांक :** 31 JAN 2018

**वाणिज्य परिपत्रक क्र.** No 00301

**विषय:** विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+ क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांच्या वीज दराच्या सवलतीबाबत सुधारित आदेश.

**संदर्भ:** १) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२३८/ऊर्जा-५ दि.२९.०६.२०१६.
२) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२३८/ऊर्जा-५ दि.२४.०३.२०१७.
३) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२३८/ऊर्जा-५ दि.२३.११.२०१७.

विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+ क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांच्या वीज दरात सवलत देण्याबाबत शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१५/प्र.क्र.२३८/ऊर्जा-५ दि.२९.०६.२०१६ व २४.०३.२०१७ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. महावितरण कंपनीतर्फे स्पष्टीकरणासाठी विचारणा करण्यात आलेली मुद्दे व विदर्भ व मराठवाडा विभागातील उद्योगांनी शासनास केलेल्या निवेदनातील मुद्दांबाबत दिनांक ३१.१०.२०१७ रोजी मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली चर्चेअंती उपसमितीने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासन आदेश संदर्भ क्र.३ निर्गमित करण्यात आला आहे.

**शासन निर्णय :-**

राज्यातील विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+ क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांच्या वीज दरात सवलत देण्याबाबत उपरोक्त शासन निर्णयाची अंमलबजावणी करताना पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

१) वीज आकारामध्ये डिमांड चार्जेसचा समावेश राहिल.

२) रुपये ४ प्रति युनिट परिणामी वीजदराची किमान मर्यादा ही या योजनेअंतर्गत सवलतीसह आहे. ग्राहकांस परिणामी वीजदरा व्यतिरिक्त एक्सेस डिमांड चार्जेस, विद्युत शुल्क व वीज विक्रीवरील कर (ED, TOSE) अतिरिक्त (उदा. शासन निर्णय दि.२३.११.२०१७ मधील परिशिष्टातील उदा. क्र.१ प्रमाणे) भरणा करणे क्रमप्राप्त आहे.

३) कार्यरत उद्योगाने दिनांक ०१.०४.२०१६ नंतर उत्पादन क्षमता व विजेची करार मागणी किंवा विजेचा वापर वाढविल्यास तसेच ओपन अ‍ॅक्सेस मधून जर एखादा ग्राहक पुन्हा महावितरणकडे आल्यास त्यास द्यावयाच्या नवीन उद्योगाची सवलतीबाबत स्वतंत्रपणे वाणिज्य परिपत्रक निर्गमित करण्यात येईल.

४) दिनांक २३.११.२०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील पूर्णत: आदिवासी उपयोजना तालुक्यातील डी+ क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांना, मराठवाडयातील औद्योगिक ग्राहकांना देण्यात येणारी उद्योगाच्या कार्यक्षमतेवर आधारित वीजदरातील सवलत दिनांक ०१.०४.२०१६ पासून शासन निर्णय दि. २९.०६.२०१६ व दि.२४.०३.२०१७ अन्वये लागू करण्यात येत आहे.

वरील मुद्दा क्र.१, २ व ४ ची अंमलबजावणी माहे जानेवारी २०१८ साठीच्या वीज वापरापासून आकारण्यात येईल.

शासन निर्णय माहे नोव्हेंबर २०१७ च्या पुर्वलक्षी प्रभावाने अंमलबजावणीसाठी आवश्यक असणा-या अनुदानासाठी शासनास पाठपुरावा करण्यात येईल. तसेच वरील बदला व्यतिरिक्त शासन निर्णय संदर्भ क्र.१ व २ मधील सवलती चालू राहतील.

सर्व क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात येते की, वरील शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी.

हे परिपत्रक, महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**<u>प्रत माहितीस सविनय सादर:</u>**
कार्यकारी संचालक (माहिती तंत्रज्ञान)

--- वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने उच्चदाब व लघुदाब औद्योगिक ग्राहकांच्या देयकाच्या संगणक प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्यात यावेत व या योजने अतंर्गत लाभ देण्यात येणाऱ्या औद्योगिक ग्राहकांना संपूर्ण तपशिल उदा. ग्राहकाचे नांव, वर्गवारी, दरमहा वापर, त्यावर अनुज्ञेय असलेली सवलत व प्रत्यक्षात देय सवलतीची रक्कम याबाबत स्वतंत्र अभिलेख ठेवावा जेणेकरुन शासनाकडून अनुदानाची मागणी करण्यात येईल.

**प्रत रवाना :- प्रेषण यादीप्रमाणे.**